INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 6 | JULY – 2024

# इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी लेखन कौशल्य विकसन कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकता अभ्यासणे

महमद शेख
गंगाई सपाटे प्रशाला, तारापूर ता. पंढरपूर

**प्रास्ताविक :**



इंग्रजी भाषा ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. विविध ज्ञानशाखेतील आधुनिक ज्ञान हे इंग्रजी भाषेमधूनच विपुल प्रमाणात उपलब्ध होते. म्हणूनच पंडित नेहरूंनी इंग्रजी भाषेला English is world language असे म्हटले आहे . इंग्रजी भाषा ही समृद्ध भाषा आहे. तिचा अधिकाधिक विकास करून ती बालमनावर बालवयात रूजविण्याचा डिसेंबर १९९९ मध्ये पहिल्या इयत्तेपासून इंग्रजी भाषा सक्तीची ठेवण्यात निर्णय घेण्यात आला आणि जून २००० पासून त्याची अंमलबजावणी करण्यात आली. संशोधक हा ग्रामीण भागातील असून त्यामुळे त्याला ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाच्या लेखन संदर्भात येणाऱ्या समस्या माहिती आहेत. अध्यापनाचा दर्जा व विद्यार्थ्यांचे लेखन सुधारण्यासाठी त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी ह्या समस्येचा विचार करणे गरजेचे आहे. विद्यार्थी लेखन करतात का? शैक्षणिक साहित्य आहे किंवा नाही? जर उपलब्ध असेल तर विद्यार्थी व शिक्षक त्याचा उपयोग कितपत करतात ? इंग्रजी विषयाच्या शिक्षकांची व्यावसायिक पात्रता काय ? लेखन कौशल्य विकसनासाठी कोणते प्रयत्न केले जातात ? त्यामध्ये कृतिकार्यक्रमाची निर्मिती करून त्याची परिणामकारकतेचा अभ्यास या संशोधनात केला आहे.

**संशोधन समस्या शीर्षक :-**

**इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी लेखन कौशल्य विकसन कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकता अभ्यासणे**

**संशोधनाची उद्दिष्टे :-**प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.
१.इंग्रजी लेखन कौशल्यातील अडचणींचा अभ्यास करणे.
२.इयत्ता पाचवीतील इंग्रजी लेखन कौशल्य विकसनासाठी कार्यक्रम विकसन करणे.
३. इयत्ता पाचवीतील इंग्रजी लेखन कौशल्य विकसनासाठी विकसित केलेल्या कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

**परिकल्पना :**इयत्ता पाचवी इंग्रजी विषयातील लेखनकौशल्य विकसनासाठी विकसित केलेल्या कृतिकार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या संपादणूकीत कोणत्याही प्रकारची वाढ होत नाही.

**संशोधन पध्दतीची निवड -**

सदर संशोधन समस्येची उद्दिष्ट्ये, स्वरुप व व्याप्ती लक्षात घेऊन संशोधकाने ऐतिहासिक, वर्णनात्मक व प्रायोगिक या तीन प्रमुख पध्दतीपैकी प्रायोगिक संशोधन पध्दतीची निवड केलेली आहे. सदर संशोधनात तुळजापूर तालुक्यातील काटी केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केमवाडी येथील विद्यार्थ्यांवर इंग्रजी लेखनकौशल्य विकसनासाठी तयार केलेल्या कृतिकार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासलेली आहे. या विद्यार्थ्यांची पूर्वचाचणी घेण्यात आली. प्रायोगिक पध्दतीतील सर्व पायऱ्यांचा उपयोग करुन निवडलेल्या गटाला उपचाराची मात्रा देण्यात

आली. शेवटी अंतिम चाचणी घेऊन निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत. थोडक्यात तयार केलेल्या कार्यनातींची परिणामकारकता प्रयोगाद्वारे तपासावे लागले म्हणून सदर संशोधनाची प्रायोगिक संशोधन पध्दतीची निवड केली गेली.

**संशोधनासाठी प्रायोगिक अभिकल्पाची निवड -** संशोधन पध्दती, विषय उद्दिष्टये व कार्यप्रणालीनुसार संशोधकाने एकलगट अभिकल्पाची निवड केलेली आहे.

**संशोधनासाठी निवडलेले साधन -** संशोधन साधने व तंत्रापैकी चाचणी या साधनांचा वापर करुन माहिती गोळा केलेली आहे. संशोधनासाठी चाचणी तयार करण्यापूर्वी संशोधकाने चाचणी या साधनाची खालील माहिती घेतलेली आहे.

**संशोधनासाठी केलेली नमुना निवड -** शाळेतील इ. ५ वी चे ३० विद्यार्थी असून विद्यार्थी संख्या ही संशोधनाची जनसंख्या आहे. या जनसंख्येतून संशोधकाने स्वनिर्णीत नमुना निवडीनुसार १०० टक्के म्हणजेच ३० विद्यार्थ्यांची निवड प्रयोगासाठी केलेली आहे. प्रयोगासाठी निवडलेले ३० विद्यार्थी जनसंख्येचे प्रतिनिधित्व करतात.

**लेखनकौशल्य विकसन कृतिकार्यक्रमाचे स्वरूप :**

| अ.क्र. | वेळ | तपशील |
|---|---|---|
| १ | १०.३०-११.३० | पूर्व चाचणी |
| २ | ९.००-१०.०० | उच्चारानुसार इंग्रजी स्पेलिंग लेखन करणे (Phonic sound) |
| ३ | १०.३०-११.३० | Silent उच्चाराचे शब्दलेखन |
| ४ | १०.३०-११.३० | एकाच उच्चाराचे शब्दलेखन |
| ५ | १०.३०-११.३० | उच्चार व शब्द यांची सांगड घालून spelling तयार करणे |
| ६ | १०.३०-११.३० | छोट्या वाक्याचा शब्दक्रम ठरवणे Sentence order |
| ७ | १०.३०-११.३० | छोट्या वाक्यांचे योग्य लेखन |
| ८ | १०.३०-११.३० | उत्तर चाचणी |

प्रायोगिक गटाला लेखनकौशल्य विकसन कृतिकार्यक्रमाच्या माध्यमातून उपचार देण्यात आले. शेवटी उत्तर चाचणी घेण्यात आली. पूर्व व उत्तर चाचणीत प्राप्त केलेल्या प्राप्तांकाचे विश्लेषण करुन संख्याशास्त्राच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले. अशाप्रकारे संशोधकाने घटकांचे अध्यापन करण्यासाठी लेखनकौशल्य विकसन कृतिकार्यक्रम अंमलबजावणी केलेली आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांची उत्तर चाचणी घेतली.

**नियंत्रित व प्रायोगिक गटाची तुलना**

| गट | मध्यमान | प्रमाण विचलन | t- मूल्य | t- मूल्यकोष्टकानुसार |
|---|---|---|---|---|
| नियंत्रित गट | 8.5 | 2.99 | | |
| प्रायोगिक गट | 13.5 | 3.22 | 2.04 | 1.8 |

**निष्कर्ष :**

वरील कोष्टकांवरून असे दिसून येते की ,मिळालेल्या **t** मूल्यावरून शून्य परिकल्पनेचा त्याग करायचा की स्वीकार करायचा हे त्या मूल्यांची ०.०५ किंवा ०.०१ या सार्थकता स्तरावर विशिष्ट स्वाधीनता मात्रेकरिता पत्रकात दिलेल्या **t** मूल्यांशी तुलना करून ठरविले जाते. यावरुन आपणाला असे अन्वयार्थ लावता येईल की, स्वाधीनता मात्रा २९ आहे. परिकल्पना द्विपुच्छ आहे. ०.०१ सार्थकता स्तराची किंमत १.८ आहे. संशोधकाने केलेल्या तुलनात्मक अभ्यासाचे t - मूल्य २.०४ आहे. हे गुणोत्तर ०.०१ सार्थकता स्तरापेक्षा जास्त आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल .

संशोधनातून आलेली **t** ची किंमत ही कोष्टकातील दर्शविलेल्या किंमतीपेक्षा अधिक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग होतो. पूर्व चाचणी व लेखनकौशल्य विकसन कृतिकार्यक्रम अंमलबजावणीनंतर घेतलेली चाचणी या गुणांमधील फरक हा योगायोगाने आलेला नसून लेखनकौशल्य विकसन कृतिकार्यक्रम अंमलबजावणी यामुळे आलेला आहे. म्हणून पूर्व चाचणी व उत्तर चाचणी या दोन गटात असणारा फरक सार्थक किंवा लक्षणीय आहे. त्यामुळे संशोधकाने मांडलेली लेखनकौशल्य विकसन कृतिकार्यक्रम अंमलबजावणीमुळे इ. पाचवीच्या

विद्यार्थ्यांच्या गुणांच्या संपादनात वाढ होते ही परिकल्पना स्वीकारावी लागते. यावरून असे म्हणता येईल की , इंग्रजी विषयाच्या लेखन कौशल्याच्या अध्यापनासाठी लेखनकौशल्य विकसन कृतिकार्यक्रमअधिक परिणामकारक आहे.

## शिफारशी :-

1. इंग्रजी विषयासाठी इयत्ता पहिली पासूनच श्रवण , वाचन , संभाषण व लेखन या कौशल्यांचा विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.
2. परंपरागत पाठांतर पद्धतीपेक्षा उपचारात्मक अध्यापन पद्धतीद्वारे विद्यार्थ्यांना अध्यापन करून त्यांच्या लेखन कौशल्याचा विकास करावा.
3. शिक्षकांनी शालेय तासिकांमध्ये मौखिक खेळ त्याच प्रमाणे स्पेलिंगचा खेळ इ. उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
5. विद्यार्थ्यांना रेडिओ , टी. व्ही. वरील शैक्षणिक कार्यक्रम दाखवावेत. नवनवीन शैक्षण्कि अनुभव देण्यासाठी प्रयत्न करावेत.
6. इंग्रजी विषयाचे गटकार्य देताना शिक्षकांनी जाणीवपूर्वक इंग्रजीचा वापर करावा. जेणेकरून विद्यार्थीसुद्धा आपापसात इंग्रजीचा वपर करतील.
7. विद्यार्थ्यांच्या लेखनातील अडचणी सोडविण्यासाठी मुलांच्या पालकांनी जाणीवपूर्वक लक्ष द्यावे. शिक्षकांनी पालकांना व विद्यार्थ्यांना मदत करावी.
8. लेखन कौशल्य सुधारण्यासाठी शिक्षकांनी वेगवेगळ्या क्लृप्त्या विद्यार्थ्यांना सांगाव्यात.

## संदर्भग्रंथ सूची


1. अब्दुल सलाम चाऊस (2009) : शब्दांवर प्रभूत्व मिळवा प्रथम आवृत्ती , नागपूर : अल्टीमेट पब्लिकेशन .
2. भिंताडे वि. रा. (1989) : शैक्षणिक संशोधन पद्धती प्रथम आवृत्ती , पुणे : नुतन प्रकाशन .
3. मुळे आणि उमाटे (1971 ) : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे द्वितीय आवृत्ती , नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ .
4. Joshi V.G. ( 1983) : 5$^{th}$ survey of education Research vol . I , New Delhi : NCERT pg. 765
5. Sharma O. P. (1982) : 4 $^{th}$ survey of educational Research Vol. I , New Delhi : NCERT pg . 750